# दूरशिक्षण विभागातर्फे ५५० ऑनलाइन लेक्चर्स

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## आजपर्यंत दहा हजार विद्यार्थ्यांनी घेतला लाभ



शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाच्यावतीने विविध अभ्यासक्रमाच्या साडेपाचशे विषयांचे ऑनलाइन लेक्चर व्हिडिओ तयार करून ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड केले आहेत. करोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाउनमुळे विद्यापीठाचे अधिविभाग बंद आहेत. या काळात विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया सुरू रहावी यासाठी विभागातील सहाय्यक प्राध्यापकांनी हा उपक्रम केला आहे.

करोना विषाणू संसर्गाचा धोका वाढल्याने १६ मार्चपासुन शिवाजी विद्यापीठातील विभाग बंद करण्यात आले. २७ मार्चपासुन विद्यापीठाच्या परीक्षा सुरू होणार होत्या. अभ्यासक्रम शिकवण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली होती. अचानक विभाग बंद झाल्याने तसेच परीक्षा रद्द होणार नसल्याने उर्वरित अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा हा प्रश्न विभागातील प्राध्यापकांच्यासमोर होता. २२ मार्च रोजी जनता कर्फ्यु तर २५ मार्चपासुन लॉकडाउन सुरू झाले. सलग २१ दिवसांचा लॉकडाउन व पुढे १९ दिवसांचा वाढीव लॉकडाउन असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी दूरशिक्षण विभागातील प्राध्यापकांनी आपापल्या विषयाचे ऑनलाइन लेक्चर्सचे व्हिडिओ बनवायला सुरूवात केली. गेल्या २० दिवसात जवळपास ५५० विषयांचे व्हिडियो बनवून तयार झाले.

दूरशिक्षण विभागात बीए, बीकॉम, बीएस्सी, यासह पदव्युत्तर व काही डिप्लोमा इन ट्रान्सलेशन स्टडी, एमबीए, व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवले जातात. या विभागात शिक्षण घेणारे विद्यार्थी काही कारणाने, जबाबदाऱ्यांमुळे नियमित कॉलेजमध्ये येऊ शकत नाहीत. नोकरी करत पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिक्षणाचा उपयोग होतो. सध्याच्या लॉकडाउन काळात विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये व परीक्षा घेण्याची घोषणा झाल्यानंतर त्यांच्यावर अभ्यासाचा ताण येऊ नये यासाठी या प्रकारच्या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली.

### सर्व व्हिडिओ संकेतस्थळावर उपलब्ध

हे सर्व व्हिडिओ विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले असून विद्यार्थ्यांना काहीही शंका असल्यास त्यांना प्राध्यापकांशी संपर्क साधता यावा यासाठी संपर्क क्रमांकही या संकेतस्थळावर देण्यात आले आहेत. गेल्या १५ दिवसांत या ऑनलाइन व्हिडिओ लेक्चर्सचा लाभ दहा हजार विद्यार्थ्यांनी घेतला आहे. व्हिडिओ अपलोड करण्याची प्रक्रिया यापुढेही सुरू ठेवण्यात येणार असल्याचे दूरशिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.?

सध्या मी नोकरी करत आहे. या नोकरीतील प्रमोशनसाठी मला पदव्युत्तर पदवीची गरज आहे. मात्र करोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये अधिविभाग बंद झाले. एकीकडे वर्क फ्रॉम होमचे टेन्शन आणि दुसरीकडे अभ्यासक्रम पूर्ण झाला नाही तर परीक्षा कशी द्यायची याचा तणाव असताना दूरशिक्षण विभागाने ऑनलाइन लेक्चरची संधी दिली याचा खूप उपयोग होत आहे. यामुळे परीक्षेचा ताणही दूर झाला आहे.

– संगीता खुपिरे, विद्यार्थिनी

एमबीएची पदवी घेण्याची इच्छा होती मात्र नियमित कॉलेजला जाऊन शिक्षण घेणे काही जबाबदाऱ्यांमुळे शक्य नव्हते. त्यासाठी दूरशिक्षण विभागातील या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. परीक्षा सुरू होण्यापूर्वी लॉकडाउनमुळे अधिविभाग बंद झाले. आता परीक्षेचा अभ्यास कसा करायचा ही समस्या समोर असतानाच ऑनलाइन लेक्चर उपलब्ध झाल्यामुळे अभ्यासामध्ये खंड पडला नाही याचे समाधान वाटते .

– संदीप पाटील, विद्यार्थी

पुढारी

# विद्यापीठ परीक्षा 'यूजीसी'च्या निर्णयानुसार

## उन्हाळी सत्राच्या ६८० परीक्षा; तीन जिल्ह्यांतून सुमारे अडीच लाख विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय व राज्य शासनाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालानंतर शासन निर्देशाप्रमाणे होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी पत्रकाद्वारे दिली.



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रात ६८० परीक्षा घेण्यात येणार असून २९३ महाविद्यालयातील सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने विद्यापीठामार्फत मार्च-एप्रिल २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व मौखिक, प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा जाहीर करून त्याबाबतची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात येईल, हे यापूर्वीच विद्यापीठाने सर्व घटकांना कळविले आहे.

विद्यापीठ परीक्षेसंदर्भात विविध माध्यमांतून प्रसारित बातम्यांमुळे संभ्रम निर्माण होत आहे. हा संभ्रम टाळण्यासाठी उन्हाळी सत्रातील परीक्षेबाबत कार्यवाही निश्चित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रानुसार गठीत समितीच्या निर्देशानुसार व महाराष्ट्र सरकारच्या सहा सदस्यीय समितीच्या अहवालानुसार व त्यानंतर प्राप्त होणाऱ्या शासन निर्देशानुसार परीक्षेसंदर्भात कार्यवाही करण्यात येणार असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाने घेतली कोरोना जनजागृती ऑनलाईन चाचणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कोव्हिड-१९ जनजागृती मोहिमेसंदर्भात ऑनलाईन प्रश्नमंजुषा चाचणी घेण्यात आली. यात सहभागी हजारो नागरिक, विद्यार्थ्यांना संरक्षणाबरोबरच कोरोनाबाबतची माहिती मिळण्यास मदत झाली आहे.

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी राज्य सरकारने लॉकडाऊन घोषित केला असून नागरिक त्याचे पालन करीत आहेत. विद्यापीठ याक ळात सामाजिक बांधीलकी जपत विविध उपक्रम राबवित आहे. विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व शिवसाह्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्र यांच्या वतीने कोरोनाविषयी जनजागृती करण्यासाठी ई-चाचणी घेण्यात आली. चाचणीचा उद्देश कोरोनाबाबत लोकांकडे किती प्रमाणात माहिती आहे, हे जाणून घेणे हा होता. चाचणीत मराठी व इंग्रजीत सुमारे वीस प्रश्न विचारण्यात आले आहेत. यात कोरोना विषाणू कोठून आला, कोरोना होण्याची कारणे, लक्षणे, त्यावरील उपाय याबाबत जनजागृती व संरक्षणविषयक प्रश्नांचा समावेश होता. प्रश्नासाठी प्रत्येकी पाच गुण देण्यात आले आहेत. चाचणीत सहभागी होणाऱ्यास ऑनलाईन ई- प्रमाणपत्र प्रश्नावली पूर्ण करून भरल्याबरोबर त्यांच्या ई-मेलवर प्राप्त होतात. आतापर्यंत सात हजारांपेक्षा अधिक सहभागींना प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे, असे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. अभय जायभाये यांनी सांगितले.

> “ कोरोनाबाबत शिवाजी विद्यापीठ जनजागृती करण्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षण, कार्यशाळा, ऑनलाईन चाचणी व सोशल मीडियाचा वापर करत आहे. यास विद्यार्थी, प्राध्यापक व सामाजातील इतरही घटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. विद्यापीठ येथून पुढेही प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यास सामाजिक बांधीलकी जपण्याची जबाबदारी स्वीकारत आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू



# विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना साहित्याची चिंता नको

## कुलगुरू डॉ. शिंदे : रुग्णालयासाठी साहित्य हलविले

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहात शैक्षणिक व अन्य साहित्य असलेल्या विद्यार्थ्यांनी काळजी करू नये. हे साहित्य विद्यापीठ नियुक्त समिती ट्रंकमध्ये सील करणार असून, संचारबंदी उठल्यानंतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत ते दिले जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. एक हजार खाटांचे रुग्णालय करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विद्यापीठातील वसतिगृहाची मागणी केली आहे. त्यानुसार वसतिगृहात रुग्णालय करण्याच्या हालचाली सुरू आहेत.

वसतिगृहातील सर्व मुले-मुली आपापल्या गावी असून, त्यांचे शैक्षणिक व अन्य साहित्य वसतिगृहातल्या खोल्यांतच आहे. स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाची सुमारे तीन-चार हजार रुपयांची पुस्तके, अभ्यासक्रमाच्या नोट्स, चादर, गादी, बह्या खोल्यांत आहेत. हे साहित्य कोठे ठेवले जाणार याची चिंता त्यांना आहे.

त्या पार्श्वभूमीवर कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या साहित्याची काळजी प्रशासन घेत आहे. त्यासाठी एक समिती तयार केली आहे. ही समिती खोलीतील साहित्य ट्रंकमध्ये सीलबंद करणार आहे. संचारबंदी उठल्यानंतर विद्यार्थी वसतिगृहात आल्यावर त्यांच्यासमोर सीलबंद ट्रंक उघडून साहित्य दिले जाणार आहे.'

# वि. रा. शिंदे यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे गाढे अभ्यासक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात गुरुवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महर्षी शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून हा कार्यक्रम करण्यात आला.

Hello Kolhapur
Page No. 2 Apr 25, 2020
Powered by: erelego.com

## थोडक्यात महत्त्वाचे

# शिवाजी विद्यापीठात महर्षी शिंदे जयंती साजरी

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते महर्षी शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.

# विठ्ठल रामजी शिंदे यांना अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नांचे गाढे अभ्यासक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महर्षी शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. सोशल डिस्टन्सिगचे नियम पाळून हा कार्यक्रम करण्यात आला.

# थोडक्यात

## यूजीसीच्या सूचनेनुसार विद्यापीठ परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांबाबत अद्याप कोणताही ठोस निर्णय झाला नसून विद्यापीठ अनुदान आयोग ज्या सूचना करेल तसेच विद्यापीठ परीक्षांबाबत नेमलेल्या कुलगुरूंच्या सहा सदस्यीय समितीच्या अहवालात जी शिफारस केली जाईल, त्यानुसारच विद्यापीठाच्या परीक्षांचे नियोजन करण्यात येईल. याबाबतचे नवीन वेळापत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवली आहे.

# विद्यापीठ परीक्षा लॉकडाऊननंतरच

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या लॉकडाऊनमुळे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिलमध्ये घेण्यात येणाऱ्या लेखी, मौखिक, प्रात्यक्षिक परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. लॉकडाऊननंतर परीक्षांच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहेत. तरी परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांनी गैरसमज करून घेऊ नये, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

लोकमत

# शासनाच्या निर्देशानंतर परीक्षांबाबत कार्यवाही

कोल्हापूर : राज्य शासनाच्या निर्देशानंतरच शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा घेण्याबाबत कार्यवाही केली जाणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने शुक्रवारी देण्यात आली.

मार्च-एप्रिलमधील उन्हाळी सत्रातील परीक्षेसंदर्भात करावयाची कार्यवाही निश्चित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) सूचनेनुसार तज्ज्ञ समिती नेमली. राज्य शासनानेदेखील सहा सदस्यीय समिती नेमली आहे. यूजीसीच्या समितीच्या निर्देशानंतर आणि राज्य शासनाच्या समिती अहवालानंतर शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानंतर परीक्षांबाबत पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

Hello Kolhapur
Page No. 4 Apr 25, 2020
Powered by: erelego.com